सायं दैनिक

# शक्ती झुंजार

अन्याय विरुद्ध वाचा फोडणारा निर्भीड व निपक्ष

संपादक :– संतोष राम काळे

वर्ष १ ले, अंक २३१ वा | पुणे, मंगळवार ११ जून २०२४ | पृष्ठे–६, किंमत : रुपये ५.०० |

VOL NO- 1, ISSUE- 231 | PUNE, TUESDAY, 11 Jun 2024 | PAGES- 6, PRICE : Rs. 5.00 |

Title - Code :-MAHMAR52803, - SDM/SR/67/2023

## बेकायदा धंदेवाल्यांकडून हप्ते वसूली दारांना पुणे शहर पोलीस आयुक्तांच्या दणका ! - बेकायदा धंदेवाल्यांचीही घेणार परेड

पुणे,दि.११:– पुणे शहरातील बेकायदेशीर धंद्यांना आश्रय देऊन वसूलदार पोलीस कर्मचाऱ्यांवर आता कारवाईची संक्रांत कोसळणार आहे. अवैध धंदेवाल्यांकडून पैशांची वसुली करणाऱ्या

पोलीस ठाण्यांच्या आणि गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांचीदेखील आता परे घेतली जाणार आहे.

पुणे शहरातील ६५ वसूलदार पोलीस कर्मचाऱ्यांची यादीच पोलीस आयुक्तांनी तयार केली आहे. या यादीमधील कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेतली जाणार आहे. या सर्वांना मुख्यालयामध्ये संलग्न केले जाणार असून त्यांचा पोलीस भरतीदरम्यान होणाऱ्या

प्रशिक्षणाच्या पार्श्वभूमीवर एक उजळणी प्रशिक्षणवर्ग देखील घेतला जाणार आहे. कोणत्याही प्रकारची अवैध धंदे किंवा पैशांची वसुली,जमिनीच्या आणि आर्थिक व्यवहारातील तोडपाणी, आर्थिक व्यवहारात मध्यस्थी आदी प्रकारची कामे पोलीस करीत असतील तर ते सहन केले जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घेतली आहे.

पुणे शहराचा पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस आयुक्तांनी शहरातील सर्व



बेकायदेशीर धंदे बंद झालेच पाहिजेत असे आदेश दिले होते. यासोबतच शहरातील पब, बार, रूफ्फ टॉप हॉटेल, रेस्टॉरंट्स यांच्यासाठी नियमावलीही केली होती. रात्री दीडनंतर या आस्थापना सुरू राहणार नसल्याचे आदेशदेखील काढले होते. त्याची कार्यवाही आणि अंमलबजावणी सुरू करण्यात आली होती. बेकायदेशीर धंदेवाल्यांसोबत स्थानिक पोलीस ठाणे स्तरावरील आणि गुन्हे शाखेतील काही वसूलदारांच्या बाबतीतील तक्रारी पोलीस आयुक्तांच्या कानावर गेल्या होत्या. पोलीस कर्मचारीच बेकायदेशीर धंद्यांना आशीर्वाद देत असल्याचेही निर्दर्शनास आले होते. त्यामुळे हे बेकायदेशीर धंदे तत्काळ बंद करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी मोहीम हाती घेतली.

पुणे शहरातील मटका, हातभट्टी, जुगार यासह तस्करी, बेटिंग, कमोडिटी, वेश्या व्यवसाय आदी बेकायदेशीर धंदेवाल्यांकडून तसेचसट्टेबाजार,जमिनीचेव्यवहार करणारे, आर्थिक वादामध्ये पडून त्यांची तोडपाणी करणारे पोलीस आता आयुक्तांच्या रडारवर आले आहेत. या पोलीस कर्मचाऱ्यांची यादी आयुक्तांनी तयार केली आहे. मागील काही दिवसांपासून या यादीवर काम करण्यात येत होते. संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांच्या आजवरच्या कामाची जंत्रीच तयार करण्यात आली आहे. त्यांच्या बेकायदेशीरवसुलीचालेखाजोखा मांडण्यात आला आहे. या संदर्भात सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. या सर्व कर्मचाऱ्यांना आता मसुधारण्यातफयेणार आहे. त्यांना मुख्यालयामध्ये संलग्न करण्यात येणार असून दररोज पूर्ण गणवेशामध्ये मुख्यालयात मपरेडसाठी उपस्थित राहावे लागणार आहे. तसेच, त्यांचा उजळणी प्रशिक्षणवर्गही घेण्यात येणार आहे.याबाबत बोलताना पोलीस आयुक्त म्हणाले की, पोलीस कर्मचारी चुकले असतील तरी त्यांना सुधारण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यांना शिक्षा करण्यापेक्षा त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा यामागे उद्देश आहे. अनेकदा पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून द्यावी लागते. त्यामुळे त्यांचा उजळणी प्रशिक्षण वर्ग घेतला जाणार आहे. यामुळे त्यांच्यामध्ये सुधारणा होईल अशी आशा असल्याचे पोलीस आयुक्त म्हणाले. सर्व वसूलदार आणि वजनदार पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उभारल्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. यासोबतच प्रामाणिक पोलीस कर्मचाऱ्यांनी मात्र, या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

पुणे शहरातील बेकायदेशीर धंदे चालवणाऱ्यांची परेड घेतली जाणार आहे. पोलीस आयुक्तांनी आता पुणे शहरातील बेकायदेशीर धंदे चालवणारे, या धंद्यांना आश्रय देणाऱ्यांना झटका देण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्व धंदेवाल्यांना पोलीस आयुक्तालयात बोलावून त्यांचाही गुंडांचा मपाहुणचारफ केला गेला तसाच मपाहुणचारफ केला जाणार आहे. तसेच, या बेकायदेशीर धंद्यांना आशीर्वाद देणाऱ्या, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावरही कारवाईचा बडगा उभारला जाणार आहे. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.